# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २२.११.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१५) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक २२ नोव्हेंबर २००५ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.३० वाज्ता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०५) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०६) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०७) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(०८) श्री. विसपुते शशांक दामोधर

**<u>संवाद :</u>**

श्री.दिलिप गायकवाड : स.सदस्य श्री. कैलास गायकवाड यांचे वडील स्व. लक्ष्मण गायकवाड यांचे नुकतेच निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.शंशाक विसपूते : यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : ठिक आहे श्रध्दाजंली साठी सर्वांनी उभे रहावे.

(याचवेळी स्व.लक्षमण गायकवाड यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.कवरसिंग बैनाडे : अनेक वेळा या सभागृहात अतिक्रमण काढण्याविषयी चर्चा झालेली आहे त्यानुसार उपआयुक्त महसूल हे निराला बाजर येथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करीत असतांना त्यांना काही व्यापाऱ्याकडून धमक्या देण्यात येत आहेत हे बरोबर नाही. अशा धमक्या कुणी व्यक्ती देत असेल तर त्याचा निषेध करतो या सभागृहाच्या वतीने मा.पोलीस आयुक्त यांना एक निवेदन देवून कार्यवाही करण्याचे सांगावे. उपआयुक्त हे अतिक्रमण काढतांना कोणताही भेदभाव करीत नाही. व पुन्हा अतिक्रमण होणार नाही या दृष्टीने या सभागृहाने सहकार्य करण्याची गरजआहे.

श्री.शंशांक विसपूते : नराला बाजर येथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत आहे आपण आदेशीत केलेले होते. त्याबद्दल उपआयुक्त महसूल योग्य प्रकारे कार्यवाही करीत आहेत त्यांचे अभिनंदन करतो. चांगली कार्यवाही होत आहे यामुळे कुणी अतिक्रमण करणार नाही, वचक बसेल. शासकीय अधिकारी यांना धमक्या येत असेल, ज्यामुळे प्रशासनावर दबाव येत आहे त्यासाठी या सभागृहाने सुध्दा प्रशासनाच्या पाठीशी रहावे .

सौ.लता दलाल : उशीरा का होईना जे मुद्दा मी अनेक वेळा उपस्थित केला होता त्यावर कार्यवाही होत आहे. त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करते. उपआयुक्त यांना धमक्या येत आहेत. या संदर्भात पोलीसात गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे का याचा खुलासा करावा तसेच व्यापाऱ्यांनी जरी सांगितले आम्ही अतिक्रमण काढून घेवू परंतू ही मोहीम निरालाबाजर पुरतीच न राबविता निराला बाजर समोरील परीसर तापडीया सर्कल असेल, सिल्लेखाना येथील असेल किंवा सि.स.नं.२०५९२ मोतीवाला कन्स्ट्रक्शन असेल किंवा सेन्ट्रल नाक्यावरील बांधकाम असेल ही मोहीम खंबीरपणे राबविण्यात यावी. सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठीशी आहोत. वृत्तपत्राच्या बातम्या वाचल्या आम्ही कुणीही नगरसेवक आकस बुध्दीने हे प्रश्न मांडत नाही. आम्ही अनुभवी नगरसेवक आहोत आम्हालाही शहराचा इतिहास माहित आहे. या शहराचा भौगोलिक दृष्टया बदल होवू नये रचनात्मक हे शहर असावे, पर्यटनाचे केंद्र हे शहर आहे. जर या शहरात कुणी बाहेरील बिल्डर येवून अतिक्रमण करीत असतील तर ही मोहीम खंबीरपणे राबविण्यात यावी. आम्ही सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठींशी आहोत.

श्री.शशांक विसपूते : निराला बाजर येथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही कुठपर्यत आलेली आहे. स्वत:हून व्यापारी अतिक्रमण काढणार होते अशी बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. जी मार्कींग करून दिली होती त्याप्रमाणे अतिक्रमण काढण्यात आलेले आहे का?

श्री.मुजेब खान : आझाद चौक ते बुढीलेन या रस्त्यावरील मालमत्ता महानगरपालिकेने संपादीत केलेल्या असून त्याचा मोबदलाही देण्यात आलेला आहे. परंतू त्या मालमत्ता आजही त्या मिळकत धारकांकडेच आहेत. या रस्त्यावरील ज्या जगेचा मोबदला महानगरपालिकेने दिलेला आहे त्या मालमत्ता महानगरपालिकेकडे हस्तांतर कराव्यात. शहांगज भागात रस्त्यावर एक हॉटेल आलेले आहे. रस्त्यावर तसेच बाजूच्या जगेत मोठया प्रमाणात अतिक्रमण केलेले आहे. संबधीत मालकास जगेचा मोबदला दिलेला असून, पुर्वीच्या स्थितीत ते हॉटेल आहे. अशा प्रकारे अनेक मालमत्ता आहेत ज्याचा मोबदला देवूनही महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. ते अगोदर क्लिअर करावे. अतिक्रमण काढतांना ज्या धमक्या अधिकाऱ्यांना येतात त्यामुळे प्रशासनाने दबावाखाली येवू नये. सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठींशी आहेत. आजच्या आज या संदर्भात मा. पोलीस आयुक्त यांना भेटून निवेदन दिले जवे. ज्यामुळे यापुढे अतिक्रमण काढण्यास प्रशासनास त्रास होणार नाही. प्रशासनाने जी कार्यवाही केलेली आहे ती योग्य आहे. आम्ही सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठीशी आहोत. ही मोहीम अशीच नेहमीसाठी राबवावी.

मा.सभापती : ज्या प्रकारे उपआयुक्त महसूल यांना धमक्या आलेल्या आहेत त्या संदर्भात स.सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. गेल्या आठ दिवसामध्ये निराला बाजर येथील अतिक्रमण हटवितांना ज्या घटना घडलेल्या आहेत त्याची माहिती उपआयुक्त महसूल यांनी द्यावी.

उपआयुक्त,(महसूल): या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली होती व तसे निर्देशही प्रशासनास दिले होते. त्यात विकास रस्त्यावरील अतिक्रमण तसेच दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त केलेले बांधकाम करून त्याचा वाणिज्य वापर सुरू केलेला होता. या

अतिक्रमण धारकांना अगोदरच नोटीसा देण्यात आल्या होत्या त्यामुळे पुन्हा नोटीसा देण्याची आवश्यकता नव्हती. या रस्त्यावर मार्कींग करण्याचे निर्देश मा.सभापती यांनी दिं.२५.१०.२००५ च्या बैठकीत दिलेले होते. त्यानुसार १७.११.२००५ रोजी या रस्त्यावर मार्कींग करण्यात आले व दुसऱ्या दिवशीपासून अतिक्रमण विभागाने अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरू केली. शेवटच्या एक दुकानचे अतिक्रमण हटविल्यानंतर तेथे स्माईल रेस्टारंटचे मालक किरण शेट्टी व इतर सहा सात व्यापाऱ्यांनी अतिक्रमण हटाव मोहिमेला विरोध केला. अतिक्रमण हटाव पथकातील कर्मचाऱ्याना शिवीगाळ केली व खंड्डे खोदून त्यात गाडण्याची धमकी दिली. या सर्व बाबींची प्रशासनाने दखल घेत दि. १९.११.२००५ रोजी या व्यापाऱ्यांविरूध्द पोलीस ठाण्यामधे गुन्हा नोंद केलेला आहे. जेसीबी ने अतिक्रमण काढल्यास आमचे मोठे नुकसान होईल म्हणून सोमवार पर्यत आम्हाला मुदत द्यावी आम्ही स्वत:हून काढून घेतो असे लेखी हमी पत्र व्यापाऱ्यांनी दिले. काल जी मुदत दिली होती ती संपलेली आहे. याच दरम्यान पुन्हा तेथील एक शिष्टमंडळ काल माझ्याकडे येवून झालेले बांधकाम काढण्यास आणखी दोन दिवस लागतील असे मागणी केली. त्यावर पुन्हा हमीपत्रदयावे अशी प्रशासनाने सूचना केली होती तसे त्यांनी दिलेले नाही म्हणून तांत्रिक दृष्टया कालपर्यत मुदत दिलेली होती ती संपलेली आहे. ज्या व्यापाऱ्यांनी अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिले होते त्यापैकी ५० टक्केच लोकांनी अतिक्रमण काढलेले आहे. आजच सकाळी प्रशासकीय अधिकारी यांनी पाहणी केलेली आहे. इतर काही व्यापारी अतिक्रमण काढून घेण्याचे काम करीत आहेत. तेथील मुख्य बाजरपेठेचे जे पार्कींग आहे ते इमारतीच्या मागच्या बाजूला आहे आणि पाकींग कडे जणारा रस्ता हा अतिक्रमण करून लहान केलाला आहे. त्यामूळे सर्व वाहने ही रस्त्यावर उभी केली जतात. या संदर्भात यापूर्वी व्यापाऱ्यांना निर्देश दिलेले होते. निरालाबाजर येथील अतिक्रमणाविषयी व दि.१८.११.२००५ पर्यत प्रशासनाने केलेली कार्यवाहीची ही सद्य:स्थिती आहे. ज्या व्यापाऱ्यांनी प्रशासकीय कामात अडथळे आणले व कर्मचारी अधिकारी यांना मारण्याच्या धमक्या दिल्या याबाबतीत प्रशासनाने सर्वाविरूध्द पोलीस कार्यवाही केलेली आहे. त्यानंतर दि.२०.११.२००५ रोजी श्री.राजू शेट्टी यांनी माझ्या निवासस्थानी असलेल्या दुरध्वनी वर ''आपण केलेली कार्यवाही ही चांगली नसून आपणांस महागात पडेल व आपण कुठेही गेलात तरी मी सोडणार नाही ''अशी धमकी दिली त्यानंतर मी लगेचच सिडको पोलीस ठाण्यात या विषयी गुन्हा दाखल केलेला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.सुधीर दाभाडे यांनी या घटनेची तात्काळ दखल घेवून कालपासून एक शस्त्रधारी पोलीस कॉन्स्टेबल माझ्या सोबत दिलेले आहे. आताच स.सदस्यांनी ज्या ठिकाणच्या अतिक्रमणाविषयी सुचना केल्या त्या संबधी प्रशासनाने झालेले अतिक्रमणाची यादी अगोदरच तयार केलेली आहे. ढोबळ आराखडा तयार केलेला असून महानगरपालिकेच्या ज्या जगा आहेत त्या जगेवरील अतिक्रमण अगोदर काढून घेण्याचे प्रशासनाचे धोरण आहे. त्यानंतर पार्कींगच्या ज्या जगा आहेत किंवा पार्कींगसाठी जे स्पेस आहे किंवा रस्त्यावर अतिक्रमणे झालेली आहेत ते खाली करून घेणार आहोत. त्यानंतर हातगाडी व इतर कच्च्या

स्वरूपाची बांधकामे असतील ती काढण्याची कार्यवाही होईल. जे कार्यवाही केलेली आहे त्यास सर्वाचा पाठींबा आहे त्याबद्दल प्रशासन सर्वांचे आभारी आहे. ही कार्यवाही अशाच प्रकारे पूढे चालू राहील.

मा.सभापती : या सभागृहातील कोणतेही सदस्य आकस बुध्दीने कुणाच्या विरोधात जत नाही. परंतू मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही होत आहे. ही कार्यवाही होत असतांना जे प्रकार घडलेला आहे तो दुर्दैवी आहे. जेंव्हा चांगले काम होते तेंव्हा सर्व सदस्य प्रशासनाच्या पाठींशी खंबीरपणे उभे असतात. जर कुणी प्रशासनास धमक्या देत असेल तर त्याचा एकमुखी निषेध सर्व सदस्यांनी केलेला आहे. कुणाचे हित जेपसण्यासाठी आम्ही निवडून आलेलो नाही. सर्व नागरीकांचे व व्यापाऱ्याचे हित जेपासावयाचे आहे व हे करीत असतांना कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहील याची सुध्दा काळजी घेतली जईल. हे शहर चांगले व सुंदर व बाजरपेठ ही चांगली कशी राहील यासाठी प्रयत्न राहील. या भागातील रस्त्यींचे जेकी महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्मारक ते वीर सावरकर याचे स्मारक पर्यत व निरालाबाजर चे संपूर्ण आयलॅड ते नागेश्वरवाडी पर्यत जे रस्ता आहे तो कॉंक्रेटीकरण करून सुंदर करून एक चांगली बाजरपेठ असावी. संपूर्ण शहराचे आकर्षण ठरावे यासाठी सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेने निर्णय घेतलेला आहे. हे करण्यास कुणी अडथळा आणत असेल तर मा.पोलीस आयुक्त यांना सुध्दा या समितीच्या मार्फत एक निवेदन दिले जईल. प्रशासनाने चांगले काम करावे सभागृह आपल्या पाठींशी आहेत. कुणाच्याही दबावाला बळी पडायचे नाही. वैयक्तिक हितासाठी प्रशासन काम करीत नाही. जनतेसाठी काम करीत आहोत हे विसरता येणार नाही. शहरातील इतर ठिकाणचे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. आताच स.सदस्य यांनी मुद्या उपस्थित केला मौलाना आझाद चौक ते बुढीलेन पर्यत रस्त्यावर जेजेअतिक्रमण आहे ते काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. ही कार्यवाही करतांना कायदेशीर पुर्तता करून ही मोहीम राबवावी व हे शहर स्वच्छ व सुंदर करावे. चांगले काम केल्याबद्दल या सभागृहाचे वतीने प्रशासनास धन्यवाद देतो.

श्री.शंशाक विसपूते : मागिल बैठकीत गुंठेवारी भागात कामे करावी म्हणून आपण निर्देश दिले होते. प्रशासनानेही मान्य केलेले होते. परंतु प्रत्यक्षात या भागात कामाला सुरूवात झालेली नाही. काही अधिकारी सांगतात तसा प्रशासनाचा लेखी आदेश मिळालेला नाही म्हणून काम करता येत नाही. तरी या भागात देखभाल दुरूस्तीची कामे सुरू करण्यात यावी व जेसर्वेचे काम झालेले आहे ते अत्यंत चांगले झालेले आहे. त्यापुढील कामास गती मिळावी त्या भागातील नागरीकांची तयारी आहे.

श्री.रविकांत गवळी : गुंठेवारी भागात जे विकास कामे केलेली आहे ती काही नगरसेवक स्वेच्छानिधीतून केलेली आहे. त्यावर देखभाल दुरूस्तीची कामे व्हावी म्हणून मागिल बैठकीत ठराव पास केला होता. परंतू तशी कामे करण्यास प्रशासनाचे कोणतेही आदेश नाहीत असे अधिकारी सांगतात. त्यामुळे मा.आयुक्तांना तसे निर्देश देण्यात यावे. या भागात त्वरीत कामे करण्यात यावी.

श्री.मुजेब खान : मागिल बैठकीत मा.आयुक्त यांनी असे म्हटले होते १० ते ११ कोटी हे विकास कामावर आतापर्यत खर्च झालेले आहे. सदर विकास कामे कोणत्या

वार्डात व कोणत्या भागात केलेली आहे. माझ्या वार्डात आजपर्यंत एकही विकास काम झालेले नाही. माहिती देण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : आताच अतिक्रमण या विषयावर चर्चा झालेली आहे. झालेले अतिक्रमण हे गेल्या १० ते १२ वर्षापासूनचे होते एका दिवसात झालेले नाही यास कोण जबाबदार आहे. त्या संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करणार आहात का? शहरात अनेक ठिकाणी अनधिकृतरित्या बांधकाम होत आहे. संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही केली पाहिजेअसे माझे मत आहे.

सौ.लता दलाल : गुंठेवारीच्या संदर्भात नागरीकांना संचिका दाखल करण्यास सांगण्यात आलेले आहे. सन २००२ ते २००४ या काळात अनेक नागरीकांनी तशा संचिका सादर केलेल्या आहेत. ज्या अधिकाऱ्याकडे जे जे भाग दिलेला होता त्या त्या भागातील संचिका त्या त्या अधिकाऱ्याकडे आहे गुंठेवारी विभागात एकही संचिका नाही अशी माहिती मिळाली. यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावे व त्यांचेकडे गुंठेवारीचे जेही काम असेल ते सोपविण्यात यावे. माझ्या वार्डातील ८० नागरीकांनी संचिका दाखल केलेल्या आहेत मला बघायला मिळाल्या नाहीत. तसेच स्वच्छतेच्या बाबतीत मी मुद्दा उपस्थित केला तेंव्हा असे दिसून आले की कामगाराची पुरेशी संख्या असून सुध्दा काम करून घेतले जत नाही. ते कर्मचारी काम करू शकत नाही, तेवढी त्याची कॅपॅसिटी नाही असे दिसून आले. त्यामुळे स्वच्छतेच्या बाबतीत संपूर्ण शहरावर परीणाम होतो आहे. जे कर्मचारी काम करू शकत नाही त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून दुसरे कर्मचारी नियुक्त करावेत किंवा खाजगी ठेकेदाराकडून काही भागाची स्वच्छता करण्यात यावी. काम झाले की त्यांचा ठेका संपेल अशा पध्दतीने त्या त्या भागात स्वच्छेतेचे काम करून घेण्यात यावे. तसेच मलेरिया विभागा मार्फत जे नाल्यामध्ये गवत येते त्यावर एक प्रकारचे ऑईल टाकल्यानंतर ते गवत जळून जत असे त्यामुळे डासांची संख्या वाढत नव्हती परंतू तशा प्रकारचे ऑईल उपलब्ध नाही ते ऑईल घेतले किंवा नाही. घेतले असेल तर वापर कुठे झाला घेतले नसेल तर का घेतले नाही? माहिती देण्यात यावी. ते घेण्यासाठी बजेटमध्ये तरतूद होती किंवा नाही याचाही खुलासा करावा.

मा.सभापती : गुंठेवारीच्या संदर्भात स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला मागिल बैठकीत मा.आयुक्त यांनी गुठेवारी भागात जी अडीच कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे ती तरतूद लाईट, ड्रेजेज तसेच पाणी पुरवठयाच्या देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी खर्च करण्यात येईल असे स्पष्ट म्हटले होते. मा.आयुक्तांचे तसे लेखी आदेश नाही असे अधिकारी स.सदस्यांना सांगतात. या बाबतीत त्या भागातील कामेच करायची नाही का असा टेक्नीकल विभागाने काही निर्णय घेतलेला आहे का खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : या संबधी नगररचना विभागाकडून माहिती घेतलेली आहे त्यांचे मार्फत सर्वेचे काम चालू आहे. ज्या अनधिकृत वसाहती गुंठेवारीच्या नियमा अंतर्गत रेग्यूलर होवू शकतात त्या भागात ही कामे होतील. ज्या संचिका मंजूरीसाठी येतात त्या संदर्भात त्या विभागाकडून माहिती घेतली जते. कोणता भाग अधिकृत होवू शकतो त्याची यादी मागविलेली आहे. त्यानुसार देखभाल दुरूस्तीची कामे करता येतील.

मा.सभापती : गुंठेवारी भागात कामे करणार की नाही याचा स्पष्ट खुलासा करावा. मा.आयुक्त त्यांचे दालनात बसलेले आहेत. शहर अभियंता तसेच सहा. संचालक नगररचना यांनी मा.आयुक्तांशी या संबधी चर्चा करून अर्ध्या तासानंतर या सभागृहात खुलासा करावा.

श्री.मुजेब खान : जेष्ठ अधिकारी आहेत त्यांना या शहराची संपूर्ण माहिती आहे. कोणता भाग अधिकृत आहे, कोणता अनधिकृत आहे. कोणते काम कोठे करता येईल हे सर्व अधिकाऱ्यांना माहित असते. अमुक अभिप्राय घेतला अमुक केले अशी उडवाउडवीची उत्तरे का दिली जतात? ही पध्दत बंद झाली पाहिजे व जे काम करायचे आहे ते केलेच पाहिजे असे केले तर शहरात दोन वर्षात कोणतेही विकास काम बाकी राहणार नाही. शहर स्वच्छ व सुंदर होण्याविषयी जी नागरीकांची भावना आहे ती दिसून येईल. अधिकाऱ्यांना विनंती की एकदुसऱ्याकडे बोट दाखवून कामात टाळाटाळ करू नये. सर्व स.सदस्य व अधिकारी मिळून मिसळून काम करावे. जेणे करून हे शहर स्वच्छ व सुंदर होईल.

सौ.लता दलाल : स्वच्छतेच्या संदर्भात मी मुद्दा उपस्थित केलेला होता त्याचा खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती : या संबधी मलेरिया विभागामार्फत खुलासा करण्यात यावा.

जीवशास्त्रज्ञ :महानगरपालिकेकडे एमएलओ ऑईल आहे जे मलेरियासाठी वापरतो ते ४६ हजर लिटर शिल्लक आहे. या आईलमुळे जेंव्हा सरफेसवर पाण्यामधे टाकण्यात येते तेंव्हा सरफेवर ते पसरल्यानंतर अळया मरतात. डायरेक्ट डासांचा मृत्यू होत नाही. या विभागात क्षेत्रीय कर्मचारी ९१ हिवताप पर्यवेक्षक एक अशा प्रकारे कर्मचारी आहेत.

मा.सभापती : आरोग्य अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधि. : आताच स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की सदर नाल्याच्या बाजूला असलेली वनस्पती ही ऑईलमुळे नष्ट होते हे चुकीचे आहे. सदर ऑइलचा थर हा पाण्यावर असतो त्यामुळे ज्या अळया पाण्याच्या थरावर येवून श्वास घेत असतात. त्या डासांच्या अळया मरण पावतात आणि डासांचे नियंत्रण करण्यास मदत होते.

सौ.लता दलाल : ज्या वेळी लेबर आमच्याकडे सह्या घेण्यासाठी येतात. ज्याज्या वेळी विचारले असता त्या वेळी ते ऑईल नाही म्हणून सांगतात. आतापर्यत मी १० ते १५ वेळेस बघीतले असेल नाला सफाई करतांना ते ऑईल टाकले जते. नाला सफाई करतांनाही बाजूला जी नाल्यामधे बेशरमी सारखी झाडे असतात त्या झाडावर डासांची अंडी असतात सदर ऑईल त्या झाडावर टाकल्यानंतर ती अंडी नष्ट होते. पाण्यावर टाकण्यात येणारे ऑईल हे वेगळे असू शकते. परंतु मला असे उत्तर देण्यात आले की सदर ऑईल आपल्याकडे उपलब्ध नाही. योग्य खुलासा करावा. ४६ हजर लिटर ऑईल होते तर का देण्यात येत नाही. असेल तर चुकीची माहिती कर्मचारी का देतात. कोणते सत्य समजवे?

आरोग्य वैद्यकीय अधि. : ऑईलमुळे वनस्पती नष्ट होत नाही.

जीवशास्त्रज्ञ : एक महिण्यापूर्वीच ऑईल आलेले आहे. लेबर जे काम करतात त्यांचेकडे देण्यात आलेले होते.

सौ.लता दलाल : लेबरकडे ऑईल दिल्या जत होते तर त्यांनी वार्डात सफाई करतांना वापर केलेला दिसून येत नाही कार्यवाही झाली पाहिजे चुकीची माहिती देत असेल तर योग्य नाही. सदर ऑईल लेबर हे कुठेतरी विक्री करतात की काय याची चौकशी झाली पाहिजेतशा सुचना देणयात याव्यात.

मा.सभापती : संबधीत मलेरिया विभाग प्रमूख यांना सुचना देण्यात येतात की. मलेरिया विभागामार्फत जे काम केले जते ते सक्षमतेने राबविण्यात यावे. स.सदस्यांच्या ज्या तक्रारी आहे त्या दुर करण्याच्या दृष्टीकोनातून विभाग प्रमुखांना आदेशीत करावे. जे लेबर असतील त्यांचेकडून सक्षमतेने काम करून घ्यावे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी जतीने लक्ष देवून ही मोहीम राबवावी.

श्री.मुजेब खान :सिडकोकडून जे नाला येतो तो औरंगाबाद टाईम्स कॉलनी पर्यत आहे.तेथे मोठया प्रमाणात घाण साचलेली आहे आपण स्वत:पाहणी करू शकता मोठया प्रमाणात दुर्गधी येते, कर्मचारी औषधी फवारणीसाठी येत नाही. सदर भागात औषधी फवारणीसाठी कोणते कर्मचारी आहे याची माहिती देण्यात यावी.

जेवशास्त्रज्ञ : गेल्या बैठकीत या संबधी चर्चा झालेली होती. केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती आपणाकडे देत आहे. (मा.सभापती यांचेकडे माहिती देतात)

मा.सभापती : नाल्याच्या साफसफाईच्या संदर्भात संबधीत अधिकारी यांनी माहिती दिली परंतू वस्तूस्थिती बघीतली तर अत्यंत खराब आहे. ओपन ड्रेनेजसोडलेल्या आहेत. त्या नाल्याचा सर्वे अधिकाऱ्यांनी केलेला दिसत नाही. कालच मी कटकटगेटपर्यत नाल्याची पाहणी केलेली आहे. घाण साचलेली दिसून येते औषधी फवारणी होत नाही ही परीस्थिती आहे.

श्री.मुजेब खान : प्रत्यक्षात कार्यवाही केलेली नाही कागदावर दाखवणे बरोबर नाही. मा.आयुक्त यांनी सदर भागात प्रत्यक्ष पाहणी करावी अशी विनंती आहे.

मा.आयुक्त : उद्या सकाळी या नाल्याची मी प्रत्यक्ष पाहणी करेल.

मा.सभापती : दोन रस्त्याचे विषय समोर आलेले आहे. दमडीमहल ब्रीज जे आहे त्यासाठी सतत दोन वर्षापासून तरतूद ठेवण्यात येत आहे. उपआयुक्त महसूल तसेच कार्यकारी अभियंता यांना सुचना करण्यात येते की जिल्हाधिकरी कार्यालय ते दमडीमहल ब्रीजसह जलना रोड पर्यत जेरस्ता रूंदीकरणाचे काम आहे जे डी.पी रस्ता आहे त्यामधे येणाऱ्या संपूर्ण मालमत्ता संपादन करण्यासाठी जी कार्यवाही मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत करून घ्यावी लागेल ती त्वरीत करण्यात यावी. या कामासाठी १५ दिवसाचा कालावधी देण्यात येतो. सहा. संचालक नगररचना यांची मदत घ्यावी. तसेच मौलाना आझाद चौक ते राममंदीर किराडपुरा रोषणगेट बुढीलेन ते टाऊनहॉल पर्यतच्या रस्त्याच्या बाबतीत १० ते १५ मालमत्ता भूसंपादीत करणे बाकी असतील उर्वरीत सर्व मालमत्ता भुसंपादीत करून मोबदला दिलेला आहे. किराडपुरा भागात ज्या १२५ मालमत्ता आहेत त्यांना सुध्दा मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र आलेले आहे.१.२५ कोटीची डिमांड केलेली आहे. यासंदर्भात मा.आयुक्त यांनी ती रक्कम देण्याच्या संदर्भात त्वरीत कार्यवाही करावी. सदर रस्ता एमएसआरडीसी करीत असल्यामुळे १५ दिवसात सदर रस्ता पजेशन देण्याच्या बाबतीत कार्यवाही करावी. दोन्ही रस्त्याच्या बाबतीत प्रशासकीय पातळीवर कार्यवाही व्हावी.

सौ.लता दलाल : याच अनुषंगाने अंजली टाकीजसमोरचा पूल आणि त्या ठिकाणी ऑयलॅण्डचे प्रपोजल होते. तेथील प्रकरण कोर्टात होते, स्टे मिळालेला आहे. त्या संबधी निकाल लागलेला आहे अशी माहिती आहे. त्या पुलाचे रूंदीकरण तसेच तेथे होणारे आयलॅण्ड डेव्हलप करणे हे सुध्दा यामधे समावेश करून कार्यवाही करण्यात यावी. या कामासाठी ६० लक्ष रूपये आलेले आहे अशी माहिती आहे. खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता :६० लक्ष रूपये महानगरपालिकेस दिलेले नाही. १६७ कोटीची जी योजना शासनाने मंजूर केलेली आहे त्यामधे ६० लक्ष रूपये सदर ब्रीज बांधण्याच्या बाबतीत तरतूद केलेली आहे. सदर ब्रीज रूंदीकरणासाठी व रस्त्यासाठी ज्या खाजगी मालमत्ता येत आहेत त्या जेपर्यत संपादन करीत नाही तोपर्यत एमएसआरडीसी तेथे काम करण्यास तयार नाही.

सौ.लता दलाल : ज्या काही मालमत्ता बाधीत होतात त्यासंबधीचे न्यायालयात प्रकरण होते निकाल लागलेला आहे अशी माझी माहिती आहे. १० ते १२ वर्षापासून वाद चालू होता. विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घ्यावा. संबधीताच्या विरोधात निकाल लागलेले आहेत. अशा वेळी ती जगा ताब्यात घेण्यास विलंब होतो व त्यामुळे संबधीत लोक पुन्हा स्टे मिळवितात.

श्री.मुजीब खान : आताच गुलशन महल ब्रीजबाबत आपण खुलासा केला, काम होत आहे हे जरी सत्य असले तरी परंतु ब्रीजकशा पध्दतीने करायचा त्याचे डिजईन कसे असावे, प्रत्यक्ष बघीतले असता सिंगल ब्रीजचे डिजईन होते. सिंगल ब्रीजकरू शकत नाही मध्येच भूमी अभिलेख विभागाचे कार्यालय आहे. त्याचे बाजूने घ्यावे लागणार असून दोन रस्ते हे पूलाच्या बाजूने येणार आहे सिंगल डिजईन आहे. योग्य ती माहिती घेवून कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी स.सदस्यांनी केलेल्या सूचनेची नोंद घेवून कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : औझादचौक ते चेलीपूरा शहाबाजर पर्यंत ज्या मालमत्ता संपादीत करणे आवश्यक होते त्या घेतलेल्या आहेत. त्या लोकांना मोबदला देवूनही त्या लोकांच्या ताब्यात आहे. ते त्या ताब्यात घेतल्यास २० ते २५ टक्के कार्यवाही बाकी राहल. उर्वरीत लोकही मालमत्ता देण्यास तयार आहे परंतू त्यांना उत्तर बरोबर दिले जत नाही. राहिला आर्थीक बाबीचा प्रश्न यासाठी मा.आमदार श्री. दर्डा साहेब तसेच मा. खासदार श्री. खैरे साहेब हे निधीतून मदत करण्यास तयार आहेत. मी प्रत्यक्ष त्यांचेशी चर्चा केलेली आहे. मा.आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल असे त्यांनी सागितलेले आहे.या संदर्भात मा.आयुक्त यांनी स्वत: विचारणा केली तर या रस्त्याचे रूंदीकरणाचे काम तात्काळ होईल असे वाटते.

मा.सभापती : या रस्त्यातील ज्या मालमत्ताच्या बाबतीत मोबदला दिलेला आहे त्या तात्काळ ताब्यात घ्याव्यात. लोकप्रतिनिधी पैसे देण्यास तयार आहेत असे म्हटले परंतू भूसंपादनासाठी तो फंडस् वापरता येत नाही अशी माझी माहिती आहे. सदर लोकप्रतिनिधींचा निधी येईल किंवा येणार नाही त्यावर अवलंबून न राहता प्रशासनाने महानगरपालिकेच्या वतीने तात्काळ कार्यवाही करावी जी १.२५ कोटी रक्कम भूसंपादन अधिकारी यांचेकडे पाठवायची आहे ती त्वरीत पाठवावी व सदर रस्त्याच्या सर्व मिळकती महानगरपालिकेच्या ताब्यात घ्याव्यात व

पुढील कार्यवाही करावी. स.सदस्य श्री.मुजेब खान यांचे निदर्शनास आणून देतो की या शहरात मत्रीमंडळाची बैठक झालेली होती, जे निधी महानगरपालिकेसाठी जहीर केलेला होता तो मिळविण्यासाठी तसेच इतर जे निधी महानगरपालिकेचा शासनाकडे प्रलंबीत आहे तो मिळविण्यासाठी प्रयत्न करावे तशी कल्पना आपण आपल्या लोकप्रतिनिधींना द्यावी. नागेश्वरवाडी पुलाच्या संदर्भात विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी.

विधी सल्लागार जे प्रश्न स.सदस्या सौ.दलाल यांनी उपस्थित केला त्या संदर्भात सदरील मालमत्तेच्या संदर्भात न्यायप्रविष्ठ प्रकरणे ही जुनी होती व तीन चार दिवसापूर्वीच प्रकरणात मनाई हुकूम रद्द झालेला आहे त्यामुळे तेथे विकास काम करता येईल कोणतीही अडचण येणार नाही.

मा.सभापती : सदर मिळकती ताब्यात घेण्याची कार्यवाही उपआयुक्त महसूल व प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी त्यानंतर अति.शहर अभियंता यांनी कार्यवाही करावी. उपआयुक्त यांना सूचना करण्यात येते की साऊंड सिस्टीमची केबीन ही समोरच्या बाजूस स्थलांतर करण्याचे आदेशीत केलेले होते. पत्रकारांना बसण्यास कक्ष कमी पडत आहे स्थलांतराची कार्यवाही त्वरीत करावी. गुंठेवारी संदर्भात प्रश्न उपस्थित झालेला होता. शहर अभियंता किंवा मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : गुंठेवारी भागात विकास कामे करण्याच्या दृष्टीने शासनाचे असे निर्देश आहे की, जे गुंठेवारी क्षेत्र नियमित होवू शकते अशा क्षेत्रामधे अत्यावश्यक देखभाल दुरूस्तीची कामे त्यामधे ड्रेनेज, पाणीपूरवठा तसेच स्ट्रीट लाईट या तीन प्रकारची कामे करता येतील यात रस्त्याच्या कामाचा समावेश नाही. या संदर्भात सर्वच अधिकाऱ्यांना तशा सूचना मागच्या बैठकीच्या वेळीच दिलेल्या आहेत. नवीन कामे होणार नाही देखभाल दुरूस्तीची कामे होतील यात रस्त्याच्या कामाचा समावेश नाही.

श्री.मुजेब खान : मा.आयुक्त यांनी मागिल बैठकीत तसे आदेशीत केलेले होते परंतू अधिकारी सांगतात तसे लेखी आदेश आमच्याकडे आलेले नाही. आम्ही कामे होतील अशी अपेक्षा करतो परंतू अधिकारी नेहमी सांगतात आम्हाला तसे आदेश नाही. जेअधिकारी जेष्ठ आहे त्यांना या शहरातील कोणता भाग अधिकृत आहे कोणता अनधिकृत आहे, कोठे काम करता येईल किंवा करता येणार नाही हे सर्व माहित आहे असे असतांना अधिकारी एकदुसऱ्याचे नाव दाखवून वेळ वाया घालवीत आहे हे बरोबर नाही.

मा.आयुक्त :अधिकाऱ्यांना सूचना की ज्या ज्या गुंठेवारी भागाची डिमांड आलेली आहे त्याची यादी तयार करावी. तो भाग नियमाधीन होते की नाही हे प्रशासकीय पातळीवर बसून निर्णय घेता येईल. जे रेग्यूलाईज होण्यासारखे आहे त्या भागात आताच सांगितल्याप्रमाणे देखभाल दुरूस्तीची कामे होतील.

श्री.मुजेब खान : या संबधी मा.आयुक्तांनी तात्काळ बैठक आयोजित करावी नसता पुन्हा अधिकारी सांगतील की, मा.आयुक्त बैठक घेणार होते घेतली नाही म्हणून कामे करता येत नाही.

मा.आयुक्त : उद्याच बैठक बोलवण्यात येईल. जे भाग रेग्यूलाईज होवू शकतो त्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे करता येतील.

**विषय क्र. ११८ :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अर्थसंकल्प २००५-०६ पान क्र.१८० अ.क्र.७४ नुसार वॉर्ड क्र.७१, सह्याद्रीनगर येथे जलनि:सारण वाहिनी टाकणेसाठी रक्कम रूपये ३.५० लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तथापी सह्याद्रीनगर येथील जलनि:सारण वाहिनी व्यवस्थीत चालू असल्याने, सदर ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकण्याची आवश्यकता नाही.

प्रभागाचे स.सदस्य यांना जलनि:सारण व्यवस्था सुस्थितीत कार्यान्वीत असल्याबाबत माहिती दिली असता, त्यांनी सदर ठिकाणी जलनि:सारण वाहिनीसाठीची आर्थिक तरतुद गटार बांधकाम करण्यासाठी वापरण्याबाबत कळविले आहे. त्यानुषंगाने मो.सह्याद्रीनगर भागात गटार बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाची दरसूची सन २००४-०५ नुसार रक्कम रूपये ३,२४,७२०/- चे तयार करण्यात आले असून, सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर करण्याकरीता मा.शहर अभियंता यांनी शिफारसीत केले आहे.

करीता अर्थसंकल्प २००५-०६ पान क्र.१८० अ.क्र०.७४ नुसार जलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठी ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून, जलनि:सारण वाहिनी ऐवजी वॉर्ड क्र.७१ सह्याद्रीनगर येथे गटार बांधकाम करण्याबाबत मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्थसंकल्प २००५-०६ पान क्र.१८० अ.क्र०.७४ नुसार जलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठी ठेवण्यात आलेल्या रक्कम रूपये ३.५० लक्षच्या जलनि:सारण वाहिनी ऐवजी वॉर्ड क्र.७१ सह्याद्रीनगर येथे गटार बांधकाम करण्यासाठी सदरील तरतुद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा येथील वाहनतळ फी वसुलीसाठी कार्यालयाची जहीर निविदा सुचना ज.क्र.मनपा/६०८/२००५ दि.१८.५.२००५ रोजे दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन सिलबंद दरपत्रके मागविण्यात आले. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री.देवेंद्र दौलत मोरे रू.१०,०००/-
२) श्री.खान जहागीर सौदागर एजन्सी रू. २,२५१/-

मनपाने दरमाह रू.९४२८/- आधारभूत किंमत आहे. श्री.देवेंद्र दौलत मोरे यांचेकडे संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ फी वसुली व सिध्दार्थ उद्यान वाहनतळ फी वसुलीची रक्कम रू.९३,३६५/- थकीत आहे. ती त्यांनी न भरल्यामुळे संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ ठेका रद्द करून मनपा कर्मचाऱ्यांमार्फत वसुली करण्यात येत आहे.

करीता क्र.२ चे ठेकेदारांना विचारणा केली असता श्री.खान जहागीर सौदागर एजन्सी यांनी दि.१७-१०-२००५ च्या अर्जद्वारे दरमाह रू.१०,०००/- प्रमाणे वसुलीचा ठेका देणे बाबत विनंती केली आहे.

श्री.खान जहागीर सौदागर यांना दि.७-११-२००५ ते ३१-३-२००६ च्या सुर्यास्तापर्यंत एकूण पाच महिन्यासाठी त्याची एकूण किंमत रू.५०,०००/- होते. संबंधीताकडून२५% रक्कम रू.१२,५००/- भरून वसुलीचा ठेका प्रती माह रू.१०,०००/- प्रमाणे खालील फी वसुली दरानुसार वसुली करणेस्तव.

१. सायकलसाठी रू.२/-
२. दुचाकी वाहनांसाठी रू.५/-
३. चारचाकी वाहनांसाठी रू.१०/-

प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : श्री. देवेद्र मोरे यांचेकडे रक्कम बाकी आहे ती कशा पध्दतीने वसूल करणार आहात याचा खुलासा करण्यात यावा.

सौ.लता दलाल : प्रस्तावात दि. ७.११.२००५ ते ३१.३.२००५ असे नमूद केलेले आहे यात दुरूस्ती करावी दि.३१.३.२००६ असे नमूद करावे.प्रस्तावात रू. २५/- असे नमूद आहे ते २५ टक्के असे करण्यात यावे.

मा.सभापती : तशी दुरूस्ती करण्यात यावी. संबधीताकडे थकबाकी आहे ती वसूली कशा पध्दतीने करणार आहे खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : वसुलीच्या संदर्भात श्री. मोरे यांचेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३४९ अन्वये त्याचे मालमत्तेची जप्तीची नोटीस काढलेली आहे, कार्यवाही सुरू केलेली आहे.

मा.सभापती : तात्काळ कार्यवाही करून सदर रक्कम संबधीताकडून वसूल करण्यात यावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा येथील वाहनतळ फी वसुलीसाठी प्राप्त निविदापैकी श्री.खान जहागीर सौदागर यांना दि.७-११-२००५ ते ३१-३-२००६ च्या सुर्यास्तापर्यंत एकूण पाच महिन्यासाठी वसुलीचा ठेका प्रती माह रू.१०,०००/- प्रमाणे खालील फी वसुली दरानुसार वसुली करण्यासाठी ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. सायकलसाठी रू.२/-
२. दुचाकी वाहनांसाठी रू.५/-
३. चार चाकी वाहनांसाठी रू.१०/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२० :**

उप आयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी आठवडी बाजर फी वसुलीसाठी कार्यालयीन जहीर निविदा सुचना ज.क्र.मनपा/मामअ/६०७/२००५ दि.८-५-२००५ रोजे सिलबंद दरपत्रके मागविण्यात आली होती. कोरी निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकही कोरी निविदा विक्री झाली नाही. कार्यालयाने दुसऱ्या वेळेस जहीर निविदा सुचना ज.क्र.मनपा/मामअ/८३९/२००५ दि.४-७-२००५ रोजे दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन सिलबंद दरपत्रके मागविले. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित्त तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली. मनपाने सदरील आठवडी बाजराची आधारभुत किंमत रू.११,०८,०००/- एवढी ठेवली होती. संबंधीताने रू.५,४०,०००/- एवढी किंमत भरली. आधारभुत किंमतीपेक्षा कमी असल्यामुळे फेर निविदा तिसऱ्या वेळेस जहीर निविदा सुचना ज.क्र.मनपा/मामअ/१०९६/२००५ दि.२५-७-२००५ रोजे दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन सिलबंद दरपत्रके मागविण्यात आली. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित्त तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

१) श्री. मुकुंद अनंतराव राहतेकर रू.१,४८,५००/-
२) श्री. रणजीत प्रसाद खरात रू.१,९८,०००/-

३) श्री. शेख हफीजइसाक रू. ९९,०००/-

मनपाने सदरील आठवडी बाजराची आधारभुत किंमत रू.११,०८,८००/- एवढी ठेवली आहे. संबंधीताने आधारभुत किंमतीपेक्षा कमी असल्याने फेर निविदा मागविण्यात आली असता दोन निविदा प्राप्त झाल्या व त्यांनी मनपाच्या आधारभुत किंमत रू.३०,८००/- अशी आहे व संबंधीताने प्रती बाजर रू.७५००/- व रू.८६००/- बोली बोलले आहे. ती मनपाच्या आधारभुत किंमतीपेक्षा कमी असल्याने श्री.स्वप्नील मांजरे व श्री.मुकुंद राहतेकर यांना दुरध्वनी करून बोलविले असता ते हजर झाले त्यांनी खालील प्रमाणे लेखी दिले.

| | |
|---|---|
| १) श्री. स्वप्नील प्रभाकर मांजरे | रू.९,५००/- |
| २) श्री. मुकुंद अनंतराव राहतेकर | जस्तीची बोली मान्य नाही. निविदेसोबत भरणा केलेली अनामत रक्कम रू.२५,०००/-व बँक गॅरंटी परत करावी असे लेखी दिले. |

करीता श्री.स्वप्नील प्रभाकर मांजरे यांना दि.३०-१०-२००५ ते ३१-३-२००६ सुर्यास्तापर्यंत एकूण २२बाजराची किंमत रू.२,०९,०००/- होते. त्यांचेकडून २५% रक्कम रू.५२,२५०/- भरणा करून वसुलीचा ठेका प्रती बाजर रू.९५००/- प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी आठवडी बाजर फी वसुलीसाठी प्राप्त निविदापैकी श्री.स्वप्नील प्रभाकर मांजरे यांना दि.३१-१०-२००५ ते ३१-३-२००६ च्या सुर्यास्तापर्यंत एकूण २२ बाजरासाठी वसुलीचा ठेका प्रती बाजर रू.९,५००/- प्रमाणे ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १२१ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जफरगेट (रविवार) आठवडी बाजर फी वसुलीचा ठेका देण्यासाठी जहीर लिलाव/निविदा सूचना ज.क्र.मनपा/मामअ/१५३४/२००५ दि.१६-९-२००५ रोजे वर्तमानपत्रात जहीर प्रसिध्दी देऊन मोफत सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेपर्यंत एकही निविदा गेली नाही. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत वेळेपर्यंत एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार एकही निविदा प्राप्त न झाल्याने सिलबंद लिफाफे मागविले असता ते ही प्राप्त न झाल्याने खुले अर्जमागविले असता चार अर्जप्राप्त झाले. ते खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | शेख अब्बास शेख रज्जक | र.रू.१९०००/- प्रती बाजर |
| २. | शेख कय्युम शेख महेमुद | र.रू.१५०००/- प्रती बाजर |
| ३. | संत सावता सेवाभावी संस्था | र.रू. ९,०००/- प्रती बाजर |
| ४. | अब्दुल मजेद शेख चाँद | र.रू.१८,१८६/- प्रती बाजर |

सदरील अर्जपैकी शेख अब्बास शेख रज्जक यांनी प्रती बाजर रू.१९०००/- देण्याचे मान्य केले असताव मा.आयुक्तांनी मान्यता दिली असता संबंधीताकडून अनामत रू.२५०००/- एक लाखाची बँक गॅरंटी व २५% बाजर रक्कम भरण्यासाठी चर्चेसाठी प्रत्यक्ष बोलवीले असता त्यांनी एक लाखाची बँक गॅरंटी देण्याबाबत असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे जफरगेट आठवडी बाजराबाबत पुन्हा विचार करणे क्रमप्राप्त झाले.

श्री.पवन दर्शनलाल जैस्वाल यांनी दि.८-११-२००५ रोजी मा.उप आयुक्त (महसूल) यांचेकडे जफरगेट आठवडी बाजराचा अर्जसह रू.२५०००/- चा डी.डी.दिला असल्यामुळे व मा.आयुक्त यांनी त्यास मंजुरी दिल्यानुसार संबंधीताकडून रू.१ लाखाची बँक गॅरंटी व २० बाजरासाठी प्रती बाजर रू.१५,०००/- (२० × १५००० = ३,००,०००) च्या पोटी २५% रक्कम रू.७५०००/- भरलेले असल्यामुळे जफरगेट आठवडी बाजर फी वसुलीसाठी श्री.पवन दर्शनलाल जैस्वाल यांना प्रती बाजर रू.१५,०००/- प्रमाणे दि.३१-३-२००६ पर्यंत देण्याचे मान्य केल्याने संबंधीताचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

उपआयुक्त महसूल : जफरगेट बाजर संबधीत जे प्रस्ताव आहे त्यात शेवटच्या परीच्छेदमधे श्री. पवन दर्शनलाल जैस्वाल यांनी दिनांक ८.११.२००५ अर्ज दिला होता तसे नमूद करणेत यावे.

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. तसेच स.सदस्य श्री मुजेबखान ,सौ. मेहरून्नीसा खान हमीद, श्री.विसपूते शशांक, डॉ. आशा बिनवडे यांनी लेखा शिर्षक बदलण्याचे प्रस्ताव दिलेले आहे त्यास मान्यता देण्यात येते. आजच्या बैठकीत ज्या ज्या सुचना संबधीत अधिकारी यांना दिलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जफरगेट (रविवार) आठवडी बाजर फी वसुलीचा ठेका श्री.पवन दर्शनलाल जैस्वाल यांना दि. ३१-३-२००६ पर्यंत एकूण २० बाजरासाठी वसुलीचा ठेका प्रती बाजर रू.१५,०००/- प्रमाणे ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती** : **स.सदस्यांचे सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.** वार्ड क्र. १०, ४२, ४३, ६९, ७८ व ८४ चे स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे, श्री.मुजेब आलमशाह खान, सौ.मेहरून्नीसा खान हमीद, डॉ.आशा बिनवडे, श्री.साहेबराव कावडे व श्री.शशांक विसपुते या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वार्ड क्र.१०, ४२, ४३, ६९,७८ व ८४ या प्रभागातील विविध कामासाठी लेखाशिर्ष बदलणे, आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | १७३/२७ | **स्पील ओव्हर मधील काम**<br>भीमनगर भावसिंगपुरा (श्रावस्तीनगर)येथे ड्रेनेज लाईन टाकणे - स्पील र. रू.३.४३ लक्ष | १. भीमनगर भावसिंगपुरा येथील मनपा शाळेमागील दवाखाना इमारतीतील उर्वरीत कामे करणे | **१.४३ लक्ष** |
| | | | २. भीमनगर भावसिंगपुरा वॉर्डात विद्युत पथदिवे बसविणे | **२.०० लक्ष** |
| ४२ | १८३/७६ | १. वॉर्ड क्र.४२ मध्ये गटारी दुरूस्ती करून आरसीसी ढापे टाकणे-३ लक्ष | **(क्र.१ व २ च्या कामाची एकत्रित रक्कम रू.६.०० लक्ष)**<br>म्हाडा कॉलनी ते रविंद्रनगर येथील नाल्यावर संरक्षित भिंत बांधून आर.सी.सी.स्लॅब टाकणे | **६.०० लक्ष** |
| | १८६४/८ | २. करीम कॉलनी ते मकसुद कॉलनी मेन सिव्हरल लाईन टाकणे - ३ लक्ष | | |
| ४३ | १८६४/३ | एस.टी.कॉलनी कटकटगेट इकरा शाळेजवळील सिव्हरलाईन दुरूस्त करणे-२.०० लक्ष | नेहरूनगर प्रभागात ट्युबलर पोल बसविणे | **२.०० लक्ष** |
| ६९ | १३५/२९ | पोलीस लोकमित्र कॉलनी येथील मनपाच्या मोकळ्या जगेस संरक्षित भिंत बांधणे.-२.५० लक्ष | **पुन:डांबरीकरण**<br>पोलीस लोकमित्र कॉलनी व उल्कानगरी यांना जेडणाऱ्या दोन्ही रस्त्यांचे वॉल टू वॉल पुन:डांबरीकरण करणे | **४.५० लक्ष** |
| | १६९/१५ | **पा.पु.देखभाल दुरूस्ती**<br>जवाहर कॉ.भागात जुन्या जलवाहिन्या बंद करून नवीन टाकणे -२.०० लक्ष | | |
| ७८ | १२४/३ | **अठरा खेडी विकास कार्यक्रम**<br>चिकलठाणा येथे डांबरी रस्ते व पुन:डांबरीकरण करणे.-४.०० लक्ष | **नवीन काँक्रीट रस्ते(अ.श.अ.विभाग)**<br>हनुमान चौक ते मनपा दवाखान्यापर्यंत काँक्रेटींग करणेसाठी अतिरिक्त तरतुद. | ४.०० **लक्ष** |
| | १७९/३८ | वॉर्ड क्र.७८ मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेजलाईन टाकणे-४ लक्ष | **नवीन काँक्रीट रस्ते(अ.श.अ.विभाग)**<br>आंबेडकर चौक ते अहिल्याबाई चौकापर्यंत रस्त्याचे काँक्रेटींग करणेसाठी अतिरिक्त तरतुद | ४.०० **लक्ष** |
| ८४ | १३४/१ | गारखेडा स.नं.५२, ५३ व ५१ मधील मनपाच्या जगेस संरक्षित भिंत बांधणे - ४.०० लक्ष | नाथ प्रांगण येथील मनपाची खुली जगा विकसित करणे | ४.०० **लक्ष** |

‘‘राष्ट्रगितानंतर‘‘सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद